पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक
# सिटी न्यूज सुपरफास्ट
मुंबई
● वर्ष १ ● अंक ६२ ● मंगळवार, दि. ४ ऑगस्ट २०२६ ● मूल्य ३ ● पृष्ठे ४
RNI No.- MHAR/ 26 /A4530 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 ■ Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

"प्रयत्न करणे कधीही सोडू नका, अपयश हा यशाच्या मार्गातील फक्त एक टप्पा आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट
तेल्हारा शहरात
अंक मिळण्यासाठी व जाहिराती साठी
संपर्क
कृष्णा विखे
शहर प्रतिनिधी
+91 7262838288

## »थोडक्यात

### शिक्षणमहर्षी डी.वाय. पाटील यांचे निधन



**कोल्हापूर :** देशातील महत्त्वाच्या शिक्षणसंस्थांचे प्रणेते, माजी राज्यपाल आणि पद्मश्री पुरस्कार विजेते ज्ञानदेव यशवंतराव पाटील अर्थात डी. वाय. पाटील यांचे कोल्हापूरमध्ये निधन झाले आहे. त्यांनी वयाच्या ९० व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. २२ ऑक्टोबर १९३५ रोजी त्यांचा जन्म झाला होता. त्यांनी महाराष्ट्रात शिक्षणमहर्षी या उपाधीने ओळखले जात होते.

---

### 'मेटा' मागणार माफी! संसदीय समितीपुढे चौकशी

**नवी दिल्ली:** फेसबुकवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा व्हिडीओ हटवण्यात आल्याप्रकरणी 'मेटा'चे प्रमुख मार्क झुकरबर्ग यांनी वैयक्तिक माफी मागावी,अशी मागणी माहिती तंत्रज्ञानविषयक संसदीय स्थायी समितीचे अध्यक्ष निशिकांत दुबे यांनी सोमवारी केली. समितीने आजच्या बैठकीत या प्रकरणावरून 'मेटा'च्या अधिकाऱ्यांना धारेवर धरल्यानंतर 'मेटा'ने माफी मागण्याची तयारी दर्शविली.

---

### दीपके यांच्या विरोधात एफआयआर दाखल

**दिल्ली :** सोशल मीडिया इन्फ्लूएन्सर दिल्लीत फैजान अन्सारी यांनी सीजेपी संस्थापक अभिजीत दीपके यांच्या विरोधात दिल्ली पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. दीपके यांच्या सहकाऱ्यांनी आपल्यावर हल्ला केल्याचा आरोप अन्सारी यांनी केला आहे. तसेच त्यांना तात्काळ अटक करण्याचीही मागणीही त्यांनी केली आहे.

---

### माजी उपमुख्यमंत्री स्टॅलिन यांना अटक!

**चेन्नई :** तामिळनाडूच्या राजकारणातून सर्वात मोठी अन् धक्कादायक बातमी समोर आली आहे. तामिळनाडूचे माजी उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांना अटक करण्यात आली आहे. अभिनेत्री त्रिशा कृष्णनबाबत वादग्रस्त वक्तव्य केल्यानंतर ही सर्वात मोठी कारवाई करण्यात आली आहे. मी याचा कायदेशीरपणे सामना करेन. मी या अटकेला एक थट्टा समजतो.

# दिल्लीत ई- 20 पेट्रोलविरोधाचा भडका!

## अरविंद केजरीवालांचा रस्त्यावर ठिय्या : पीएम हाउसकडे जाताना रोखलं

वृत्तसंस्था ४ ऑगस्ट

**नवी दिल्ली :** ई-२० पेट्रोल लागू करण्याच्या निर्णयाविरोधात अरविंद केजरीवाल यांनी पंतप्रधानांच्या निवासस्थानाकडे मोर्चा काढला. दिल्ली पोलिसांनी मोर्चा रोखल्यानंतर आप नेत्यांनी धरणे आंदोलन सुरू केले. ट्रान्सपोर्ट युनियनही संसद मोर्चाच्या तयारीत असून दिल्लीत राजकीय वातावरण तापलं आहे.देशभरात ई-२० पेट्रोल लागू करण्याच्या निर्णयाविरोधात दिल्लीत आज मोठी राजकीय घडमोड सुरू आहे. माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी पंतप्रधानांच्या निवासस्थानाकडे मोर्चा काढला असून या मुद्यावर राजधानीत वातावरण तापलंय. दुसरीकडे ट्रान्सपोर्ट युनियननेही ई-२० पेट्रोलच्या विरोधात संसदेकडे कूच करण्याची तयारी केली आहे. त्यामुळे E२० इंधनाच्या मुद्द्यावरचा वाद आणखी तीव्र होताना दिसत आहे.

आम आदमी पक्षाचा आरोप आहे की, देशभरात ई-२० पेट्रोल लागू करण्याचा निर्णय घेताना केंद्र सरकारने सर्वसामान्य नागरिक आणि कोट्यवधी वाहनधारकांच्या अडचणींचा पुरेसा विचार केलेला नाही. खास करून जुन्या वाहनांवर



ई-२० पेट्रोलचा काय परिणाम होईल, याबाबत नागरिकांच्या मनात अनेक प्रश्न आहेत. या सर्व मुद्यांकडे सरकारने दुर्लक्ष केल्याचा आरोप पक्षाने केला आहे. याच पार्श्वभूमीवर अरविंद केजरीवाल यांनी त्यांच्या पक्ष कार्यालयातून समर्थकांसह पंतप्रधानांच्या निवासस्थानाकडे मोर्चा सुरू केला आहे. मोर्चा पुढे सरकत असताना दिल्ली पोलिसांनी फिरोजशाह रोडवर त्यांना अडवलंय. पोलिसांचं म्हणणं आहे की, या मोर्चासाठी आवश्यक परवानगी घेण्यात आलेली नव्हती. मोर्चा रोखल्यानंतर अरविंद केजरीवाल यांनी माघार घेतलेली नाही.

### पंतप्रधानांची भेट घेण्यासाठी आलो : केजरीवाल

अरविंद केजरीवाल, दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया आणि शेकडो कार्यकर्त्यांसह धरणे आंदोलनाला बसले आहेत. केजरीवाल यांनी सांगितले की, 'मी माझ्यासोबत २.३० लाखांहून अधिक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या असलेलं निवेदन घेऊन आलो आहे. सरकारने जनतेवर जबरदस्तीने ई-२० पेट्रोल लादणं तातडीने थांबवावं. आम्ही याठिकाणी केवळ पंतप्रधानांची भेट घेण्यासाठी आलो आहोत.'

## आदित्य ठाकरेंवर FIR नोंदवून CBI तपास व्हावा, दिशा सालियानच्या वडिलांची विनंती, हायकोर्टाने मुंबई पोलिसांना खडसावलं

प्रतिनिधी ४ ऑगस्ट

**मुंबई :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांच्याविरोधात एफआयआर नोंदवून सीबीआय तपासाचा आदेश देण्याची विनंती दिशा सालियनच्या वडिलांनी अ‍ॅड. नीलेश ओझा यांच्यामार्फत केली आहे.

'दिशा सालियानच्या मृत्यूबाबत वडिलांनी संशय व्यक्त केला होता, तर पोलिसांनी एफआयआर का नोंदवला नाही? अपघाती मृत्यूचे प्रकरण का दाखल केले? कोणत्या बाबींमुळे पोलिसांना या प्रकरणाचा तपास करण्यापासून रोखण्यात आले?' असा प्रश्न मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी मुंबई पोलिसांसमोर उपस्थित केला. अभिनेता सुशांतसिंह राजपूत याची मॅनेजर असलेल्या



दिशाचा ८ जून २०२० रोजी मालाड येथील एका निवासी इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला होता. चौकशीअंती दिशाने जीव दिल्याचा निष्कर्ष काढला होता. मात्र, दिशाचे वडील सतीश सालियन यांनी गेल्या वर्षी याचिका करून आपल्या मुलीवर सामूहिक अत्याचार करण्यात आला आणि नंतर तिची हत्या करण्यात आली, असा आरोप केला आहे. या प्रकरणात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आणि माजी मंत्री आदित्य ठाकरे यांच्याविरोधात एफआयआर नोंदवून सीबीआय तपासाचा आदेश देण्याची विनंतीही सालियन यांनी अ‍ॅड. नीलेश ओझा यांच्यामार्फत केली आहे. याविषयी न्या. भारती डांगरे व न्या. मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. मुख्य सरकारी वकील शिशिर हिरे यांनी बाजू मांडली. शिशिर हिरे यांनी न्यायालयाला सांगितले की, या प्रकरणाची नोंद 'अपघाती मृत्यू' अशी करण्यात आली होती आणि दोनदा चौकशी करण्यात आली; दोन्ही वेळा तिने जीव दिल्याचेच निष्पन्न झाले. या प्रकरणातील साक्षीदारांनी दिलेल्या जबाबांवरुनही या निष्कर्षाला दुजोरा मिळाला" असे ते म्हणाले. न्यायालयाच्या खंडपीठाने असाही प्रश्न उपस्थित केला की, शवविच्छेदन अहवालानुसार, इतक्या उंचावरुन पडूनही संबंधित व्यक्तीच्या शरीरावर कोणतीही दुखापत का आढळली नाही. "जर एखादी व्यक्ती १४ मजल्यांच्या उंचीवरुन खाली पडली, तर तिच्या शरीरावर काहीच जखमा होणार नाहीत का?" असा प्रश्न न्यायमूर्ती डांगरे यांनी विचारला. त्यावर हिरे यांनी सांगितले की, छायाचित्रांनुसार संबंधित व्यक्तीच्या डोक्याला दुखापत झाली होती.

## मुंबई पोलिस दलात तब्बल साडेसहा कोटींचा घोटाळा!

### पाच जणांविरुद्ध गुन्हा, दोन पोलिस कर्मचारी निलंबित

प्रतिनिधी ४ ऑगस्ट

**मुंबई :** इतरांचे कारनामे, घोटाळे उघडकीस आणणाऱ्या, अनेक मोठ्या घोटाळ्यांचा तपास करणाऱ्या मुंबई पोलिस दलातच कोट्यवधींचा वेतन घोटाळा घडला आहे. पोलिसांचे वेतन तसेच इतर प्रशासकीय काम करणारे मंत्रालयीन कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी हा घोटाळा केला असून, शासनाच्या सुमारे साडेसहा कोटी रुपयांवर डल्ला मारला आहे. आठ ते दहा जणांना पोलिस असल्याचे दाखवून त्यांच्या नावाने असलेल्या बँक खात्यांवर पगाराच्या रकमा पाठविण्यात आल्याचे दिसून आले. याप्रकरणी पगार तसेच इतर प्रशासकीय कामे पहाणाऱ्या पाच अधिकारी आणि कर्मचारी यांच्याविरुद्ध समतानगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उत्तर प्रादेशिक विभाग कार्यालयातील पोलिस निरीक्षकाच्या तक्रारीवरून समतानगर पोलिस ठाण्यात, शासनाची फसवणूक करणे, पुरावे नष्ट करणे, कट रचणे अशा वेगवेगळ्या कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार पोलिस कर्मचाऱ्यांचा डेटा जुन्या 'सेवार्थ' वेतन प्रणालीतून नवीन प्रणालीमध्ये स्थलांतरित करताना ही संशयास्पद अनियमितता समोर आली. जे लोक पोलिस कर्मचारी नव्हते, त्यांना पोलिस कर्मचारी म्हणून दाखवण्यात आले आणि त्यांच्या नावावर वेतनाची प्रक्रिया करण्यात आली, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. याबाबत संशय निर्माण झाल्यानंतर ऑडिट करण्यात आले. या ऑडिटमध्ये २०१९ आणि २०२० या वर्षांतील काही महिन्यांच्या पगाराच्या रकमांमध्ये मोठी तफावत आढळली. यावरून तत्कालीन प्रशासकीय अधिकारी रामकिशन गोस्वामी, नागेश तळवडेकर, विजया चव्हाण, प्रमुख लिपिक अजय राठोड, वरिष्ठ लिपिक अमोल मेश्राम यांच्यासह इतर आरोपींवर हा घोटाळा केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. तसेच तत्कालीन प्रमुख लिपिक आरोपी विजया चव्हाण आणि तत्कालीन वरिष्ठ लिपिक अमोल मेश्राम यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.



### बाहेर पोलिसांची 'गांधीगिरी', अन् घरात चिमुकल्यांची 'हल्मेटगिरी'!'

अकोला हेल्मेट घालणाऱ्यांचे सिव्हिल लाईन्स पोलिसांचा गुलाब फूल देऊन सुरक्षेचा संदेश दिला गेला. तर हेल्मेट फिव्हर इतका घराघरात पोहचला आहे की, चिमुकल्याने घरात हेल्मेट घालून चांगलाच धिंगाणा घातला आहे.

## मोदी सरकारची पुन्हा कोंडी होणार!

### राम मंदिराचा मुद्दा तापणार, विरोधकांचा प्लॅन ठरला

प्रतिनिधी ४ ऑगस्ट

**नवी दिल्ली :** दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनामुळे काही काळ राजकीय चर्चेतून मागे पडलेले अयोध्येतील राममंदिर दानचोरीचे प्रकरण पुन्हा एकदा संसदीय चर्चेच्या केंद्रस्थानी येण्याची स्पष्ट चिन्हे आहेत. अपक्ष खासदार पप्पू यादव यांनी संसद परिसरात केलेल्या आंदोलनानंतर काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील पक्षांनी हा मुद्दा अधिक आक्रमकपणे लावून धरण्याचा निर्णय घेतल्याचे संकेत सोमवारी मिळाले.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून राममंदिर दानचोरीचा स्वतंत्र आणि व्यापक चौकशीची मागणी केली होती. पंतप्रधानांचे मौन योग्य नसल्याचा आरोपही त्यांनी केला. त्यानंतर यादव यांनी संसदेबाहेर साधूवेष धारण करून हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आणला. या आंदोलनानंतर त्यांच्याविरोधात तक्रार आणि एफआयआरची नोंदही झाली, त्यालाही त्यांनी आव्हान दिले आहे. यादव यांनी संसद परिसरात दानपेटी आणताच सोमवारीही तशीच दानपेटी ठेवण्यात आली होती व विरोधी पक्षांचे खासदार त्यात नोटा टाकताना दिसत होते. ही पेटी नंतर कोठे जाते, असे एका काँग्रेस नेत्याला विचारले असता, त्या पैशाची चोरी तर नक्कीच होत नाही असे त्यांनी सांगितले.

कामकाज सुरू होण्यापूर्वी खर्गे यांच्या दालनात इंडिया आघाडीच्या



पक्षनेत्यांची बैठक झाली. या बैठकीत झालेल्या चर्चेवरून विरोधकांची रणनीती दोन स्तरांवर दिसते. आधी, कोट्यवधी रामभक्तांच्या श्रद्धेशी संबंधित दानव्यवस्थेत पारदर्शकतेचा प्रश्न उपस्थित करणे आणि दुसरा म्हणजे सरकारकडून याबद्दल जबाबदारी निश्चितीची मागणी करणे. राममंदिर भूमीपूजन, ट्रस्टी नेमणे, त्या मंदिराचे उद्घाटन हे सारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यालयाच्या माध्यमातून नियंत्रित झाल्याचे सांगितले जात असताना याची थेट जबाबदारी घेणे टाळले जात आहे, असा विरोधकांचा आरोप आहे.

### सरकारला कोंडीत पकडण्यासाठी प्रभावी मुद्दा

दरम्यान, आगामी काळात राजकीयदृष्ट्या हा मुद्दा संसदेत किती काळ टिकतो हे तपासातील पुढील घडामोडी, एसआयटीचा अहवाल आणि न्यायालयीन प्रक्रियेवर अवलंबून असेल. मात्र, विद्यार्थी आंदोलनानंतर विरोधकांनी सरकारला कोंडीत पकडण्यासाठी हा प्रभावी मुद्दा आक्रमकपणे लावून धरल्याचे स्पष्ट आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विरोधकांकडून सरकारला या प्रकरणावर चर्चेस भाग पाडण्याचा प्रयत्न होणार असल्याचे संसदीय सूत्रांनी सांगितले.

## पावसामुळे धरणांमधील पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ!

### वान 60 टक्के पार, काटेपूर्णा 25 टक्क्यांच्या उंबरठ्यावर

प्रतिनिधी ४ ऑगस्ट

**अकोला :** गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात सुरू असलेल्या दमदार हजेरीमुळे अकोलेकरांची पाण्याची चिंता बरीच अंशी मिटली आहे.

अकोला पाटबंधारे विभागाने जारी केलेल्या ३१ जुलै आणि १ ऑगस्ट २०२६ च्या अहवालानुसार, जिल्ह्यातील सर्व प्रमुख प्रकल्पांमधील उपयुक्त पाणीसाठ्यात समाधानकारक वाढ झाली असून अकोलेकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.

प्रामुख्याने अकोला शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा प्रकल्पात एकाच दिवसात तब्बल ३.१७ दशलक्ष घनमीटर पाण्याची भर पडली आहे. ३१ जुलै रोजी २०.८५ टक्के

| प्रकल्पाचे नाव | पाणीसाठा (%) (३१ जुलै) | पाणीसाठा (%) (१ ऑगस्ट) | २४ तासांतील वाढ (दशलक्ष घनमीटर) |
|---|---|---|---|
| 1 काटेपूर्णा | 20.85 % | 24.52 % | + 3.17 |
| 2 वान (तेल्हारा) | 53.02 % | 61.93 % | + 7.30 |
| 3 मोर्णा (पातूर) | 56.82 % | 59.06 % | + 0.93 |
| 4 निर्गुणा (पातूर) | 37.30 % | 42.25 % | + 1.43 |
| 5 दगडपारवा | 45.33 % | 47.98 % | + 0.28 |
| 6 उमा (मूर्तीजापूर) | 2.51 % | 4.17 % | + 0.19 |

असलेला साठा आता २४.५२ टक्क्यांवर पोहोचला आहे. प्रकल्पनिहाय पाणीसाठ्याची स्थिती (तुलनात्मक): वान प्रकल्प (तेल्हारा): जिल्हयातील सर्वात मोठा दिलासा वान प्रकल्पाने दिला आहे. एकाच दिवसात पाणीसाठा ५३.०२ टक्क्यांवरून थेट ६१.९३ टक्क्यांवर पोहोचला आहे. ३१ जुलैला १०९ मिमी पावसाची नोंद झाल्याने साठ्यात तब्बल ७.३० दशलक्ष घनमीटरने वाढ झाली आहे. काटेपूर्णा प्रकल्प: जलपातळी ३४१.०१ मीटरवरून ३४१.५० मीटरवर पोहोचली आहे. साठा २०.८५ टक्क्यांवरून २४.५२ टक्के झाला आहे. मोर्णा प्रकल्प (पातूर): मोर्णा प्रकल्पाची टक्केवारी ५६.८२ टक्क्यांवरून ५९.०६ टक्के झाली आहे. निर्गुणा प्रकल्प (पातूर): प्रत्यक्ष पाऊस झाला नसला तरी वरील क्षेत्रातील आवकेमुळे साठा ३७.३० टक्क्यांवरून ४२.२५ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. दगडपारवा प्रकल्प: साठ्यात वाढ होऊन तो ४५.३३ टक्क्यांवरून ४७.९८ टक्के झाला आहे. उमा प्रकल्प (मूर्तीजापूर): उमा प्रकल्पातील साठा अतिशय कमी (२.५१ टक्के) होता, त्यात किंचित वाढ होऊन तो ४.१७ टक्के झाला आहे.



## पोलिसात आज, उद्या गुन्हा दाखल होणार पण,कृषी विद्यापीठाचे इभ्रतीचे काय ?

प्रतिनिधी ४ ऑगस्ट

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात झालेल्या ४० लाखांच्या भ्रष्टाचाराची तक्रार एम आय डी सी पोलिसात करण्यात आली आहे. याविषयावर कुलगुरु डॉ.शरद गडाख, कुलसचिव प्रिती रोडगे यांनी चुप्पी साधली. तर कुलसचिव यांनी तपासणीअंती माने यांना निवड समितीवर ठेवण्यात येईल की नाही या विषयी निर्णय घेऊ असे तोंडी सांगत अधिक बोलणे टाळले. या भ्रष्टाचार प्रकरणात कुलगुरुंनी दोषींवर गुन्हा दाखल करण्याची पुर्व परवानगी दिली आहे. त्यामुळे या प्रकरणात एम आय डी सी पोलिसांनी त्वरीत गुन्हे दाखल करावेत असे फर्मान वरिष्ठांनी दिल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे या प्रकरणात आता दोषींवर कडक कारवाईची शक्यता वाढली आहे.

कृषी विद्यापीठात लाखों रुपयांचा घोटाळा उघड झाला असताना कृषी विद्यापीठात दोषींवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्याऐवजी त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे कृषी विद्यापीठ प्रशासनाच्या हेतूवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विद्यापीठातील ७ तपासणी समित्यांच्या चौकशी अहवालानंतर तत्कालीन सहयोगी अधिष्ठाता तसेच संशोधन संचालक डॉ. श्यामसुंदर माने यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांवर एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. विद्यापीठ एका प्रकरणात डॉ.मानेवर गुन्हा दाखल करण्यास तयार असताना दूसरीकडे 'प्रकल्पग्रस्त भरती प्रक्रियेच्या' निवड समितीचे अध्यक्षपदावर कायम कोणाच्या आदेशने ठेवले गेले. या विषयावर सोमवारी कृषी विद्यापीठात कुलगुरु व कुलसचिव यांनी कुठलीही अधिकृत प्रतिक्रिया कॅमेरा समोर दिली नाही. त्यामुळे डॉ.माने यांना वाचविण्याचा प्रयत्न होत आहे. या विषयावर कुलगुरुंनी सतीश ठाकरे यांच्याकडे अंगुलीनिर्देश केल्यानंतर आमच्या प्रतिनिधींनी भेट घेतली असता सतीश ठाकरे कुठलिही माहिती दिली नाही. त्यामुळे कृषी विद्यापीठ झालेल्या भ्रष्टाचारावर तर पांघरुण घालतच आहे. इतकेच नाही तर प्रकल्पग्रस्तांच्या नोकरभरती प्रक्रियेवर संशय निर्माण करत उमेदवारांच्या भविष्यासोबत खेळत असल्याची ओरड आहे.

# जागतिक स्तनपान सप्ताह : बाळासाठी अमृत, आईसाठी आरोग्याची गुरुकिल्ली!

दरवर्षी १ ते ७ ऑगस्ट हा कालावधी जागतिक स्तनपान सप्ताह म्हणून साजरा केला जातो. या सप्ताहाचा उद्देश स्तनपानाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे, नवमातांना योग्य मार्गदर्शन करणे तसेच स्तनपानाबाबतचे समज-गैरसमज दूर करणे हा आहे. यंदाच्या जागतिक स्तनपान सप्ताहाची संकल्पना आहे –("Breast-feeding for a Sustainable Start in Life: Strengthen What Works" ) "शाश्वत जीवनाची सुदृढ सुरुवात स्तनपानातून: जे प्रभावी आहे ते अधिक बळकट करूया."



या संकल्पनेचा मुख्य हेतू स्तनपानाला प्रोत्साहन देणाऱ्या सर्व उपाययोजना अधिक प्रभावी करणे आणि प्रत्येक नवजात बालकाला आयुष्याची सर्वोत्तम सुरुवात मिळवून देणे हा आहे. यासाठी जन्मानंतरच्या पहिल्या एका तासात स्तनपान सुरू करणे आणि पहिले सहा महिने केवळ आईचे दूधच देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जन्मानंतर आईच्या स्तनातून येणारा पहिला पिवळसर दाट द्रव म्हणजे 'चीक' (Colostrum). हा बाळासाठी अमृतासमान असून रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारा पहिला नैसर्गिक संरक्षक कवच आहे.बाळासाठी स्तनपानाचे फायदे • जन्मापासून सहा महिने संपूर्ण आणि संतुलित पोषण

**आरोग्य विभाग**
**अकोला**

मिळते. • रोगप्रतिकारक शक्ती वाढते व संसर्गाचा धोका कमी होतो. • अतिसार, न्यूमोनिया, कानाचे आजार आणि इतर संसर्गांपासून संरक्षण मिळते. • मेंदूचा विका उत्तम होऊन बौद्धिक क्षमता वाढण्यास मदत होते. • पचनक्रिया सुरळीत राहते व बद्धकोष्ठतेचा त्रास कमी होतो. • लठ्ठपणा, मधुमेह आणि काही दीर्घकालीन आजारांचा धोका कमी होऊ शकतो. • आई-बाळातील भावनिक नाते अधिक दृढ होते. आईसाठी स्तनपानाचे फायदे • प्रसूतीनंतर गर्भाशय पूर्वस्थितीत येण्यास मदत होते. • प्रसूतीनंतर होणारा रक्तस्राव कमी होतो. • स्तन व अंडाशयाच्या कर्करोगाचा धोका कमी होण्यास मदत होते. • टाइप-२ मधुमेह आणि काही हृदयविकारांचा धोका कमी होऊ शकतो. • वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते. • स्वच्छ, सुरक्षित, सहज उपलब्ध आणि किफायतशीर पोषणाचा पर्याय आहे. • आईचा आत्मविश्वास वाढतो आणि बाळाशी भावनिक जवळीक अधिक दृढ होते. स्तनपानाची योग्य पद्धत • जन्मानंतर शक्यतो पहिल्या एका तासात स्तनपान सुरू करावे. • पहिले सहा महिने केवळ आईचे दूध द्यावे. पाणी, मध, गुटी किंवा इतर कोणताही आहार देऊ नये.
• बाळाला भूक लागेल तेव्हा मागणीनुसार स्तनपान करावे. • स्तनपान करताना आई आरामदायी स्थितीत बसावी किंवा झोपावी. • सहा महिन्यांनंतर पूरक आहार सुरू करून दोन वर्षे किंवा त्याहून अधिक काळ स्तनपान सुरू ठेवावे. आपली जबाबदारी स्तनपान हा प्रत्येक बाळाचा जन्मसिद्ध हक्क आणि आईकडून मिळणारी सर्वोत्तम नैसर्गिक भेट आहे. योग्य माहिती, कुटुंबाचा आधार आणि समाजाचा सकारात्मक दृष्टिकोन यामुळे प्रत्येक बालकाला स्तनपानाचा लाभ मिळू शकतो. जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त स्तनपानाबाबत जनजागृती करूया, समज-गैरसमज दूर करूया आणि प्रत्येक मातेला स्तनपानासाठी प्रोत्साहन देऊया.

# राजर्षी शाहू महाराज कलाकार मानधन योजना



महाराष्ट्राचा लोकसंस्कृतीचा वारसा: भजन, कीर्तन, पोवाडा, लावणी, गोंधळ, भारूड आणि तमाशा यांसारख्या लोककलांनी शतकानुशतके समाजप्रबोधन केले. मात्र, आयुष्यभर समाजमन घडवणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांचा वृद्धापकाळ अत्यंत हलाखीत जातो. योजनेचा उद्देश आणि त्रुटी: ५० वर्षांवरील कलावंतांना दरमहा ₹५,००० मानधन देऊन सन्मान देण्याचा शासनाचा हेतू पवित्र आहे. परंतु दलालांचा हस्तक्षेप, माहितीचा अभाव, तांत्रिक अडचणी आणि निवडीतील पारदर्शकतेचा अभाव यांमुळे खरे गरजू कलाकार यापासून वंचित राहत आहेत. समितीतील घराणेशाही व गैरव्यवहार: जिल्हा निवड समित्यांमध्ये राजकीय वशिल्याने वर्षानुवर्षे तेच अशासकीय सदस्य नेमले जात असल्याने मक्तेदारी निर्माण झाली आहे. कला क्षेत्राशी संबंध नसलेल्या अपात्र व्यक्तींना आणि एकाच कुटुंबातील अनेक जणांना लाभ दिला जात असल्याच्या तक्रारी आहेत.

सुधारणा व

**प्रा. प्रज्ञानंद थोरात**
**मो.9822674487**




उपाययोजना:
१. समितीची पुनर्रचना: अशासकीय सदस्यांना दोनपेक्षा जास्त वेळा संधी न देता रोटेशन पद्धतीने नवीन व निष्पक्ष व्यक्तींना घ्यावे.
२. कडक अंमलबजावणी: तुकाराम मुंढे यांच्यासारख्या प्रामाणिक व कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांकडे योजनेची धुरा देऊन थेट मैदानी तपासणी, मुलाखत आणि सादरीकरणाद्वारे कलाकारांची निवड व्हावी.
३. डिजिटल पारदर्शकता व मदत: तालुकानिहाय माहिती शिबिरे, ऑनलाईन याद्यांचे प्रकाशन, तक्रार निवारण हेल्पलाइन आणि दलालांवर कठोर कायदेशीर कारवाईची गरज आहे.

खऱ्या पारंपारिक कलावंतांना न्याय देऊन ही योजना पारदर्शकतेने राबवली, तरच महाराष्ट्राची लोकसंस्कृती आणि शाहू महाराजांचा वारसा खऱ्या अर्थाने जपला जाईल.

लेखक - संजय कडोळे

# अष्टपैलू अभिनयाचे मराठीतील दिग्गज अभिनेता!



**दिलीप प्रभावळकर हे एक प्रसिद्ध भारतीय अभिनेते, लेखक आणि नाटककार आहेत. ते त्यांच्या अष्टपैलू अभिनयासाठी ओळखले जातात, जसे की 'तात्या विंचू' (झपाटलेला), 'श्रीयुत गंगाधर टिपरे', आणि हिंदी चित्रपट 'लगे रहो मुन्ना भाई' मधील महात्मा गांधींची भूमिका यांनी त्यांना एक वेगळी ओळख दिली. त्यांचा जन्म ४ ऑगस्ट १९४४ रोजी झाला.**

मुंबईच्या रुईया कॉलेजमधून जैवभौतिक शास्त्रात पदव्युत्तर शिक्षण. अभिनय क्षेत्रात येण्यापूर्वी ते एका औषध निर्माण कंपनीत उच्च पदावर कार्यरत होते. 'झपाटलेला' मधील तात्या विंचू व लघूमाणूस, 'चौकट राजा' (दिव्यांग मुलाची भूमिका), 'एक डाव भुताचा'. तसेच 'श्रीयुत गंगाधर टिपरे' (आबा), 'चिमणराव-गुंड्याभाऊ'. 'हसवाफसवी' (अनेकविध भूमिका असलेले प्रसिद्ध नाटक). 'लगे रहो मुन्ना भाई' (२००६) मध्ये महात्मा गांधींची अजरामर भूमिका. रंगभूमी आणि चित्रपट क्षेत्रातील दीर्घ व प्रभावी योगदानासाठी त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला आहे. दिलीप प्रभावळकर हे एक भारतीय मराठी आणि हिंदी चित्रपट अभिनेते आहेत. दशावतार २०२५ या मराठी चित्रपटामध्ये 'बाबूली मेस्त्री' यांची प्रमुख भूमिका साकारली. झपाटलेला या मराठी चित्रपटातील 'तात्या विंचू' आणि चौकट राजा आणि एक डाव भुताचा या चित्रपटात मुख्य भूमिका बजावली. मराठी दूरचित्रवाणीमध्ये ते नेहमी 'आबा गंगाधर टिपरे ' म्हणून ओळखले जातील आणि चिमणराव -गुंड्याभाऊ यांच्या 'चिमणीव' मराठी रंगभूमीवरील, 'हसवा फसवी' आणि 'वासूची सासू' मधील त्यांच्या भूमिका फार लोकप्रिय झाल्या. प्रभावळकर यांना इ.स. २००६ च्या 'लगे रहो मुन्ना भाई' चित्रपटात महात्मा गांधी यांच्या भूमिकेसाठी पुरस्कार मिळालेला आहे. तेलगू रिमेक, शंकरदादा जिंदाबादमध्ये गांधींची भूमिका त्यांनीच केली. याशिवाय, प्रभावळकर यांनी अनेक नाटके आणि लहान मुलांसाठी पुस्तके लिहिली. दिलीप प्रभावळकर हे 'चिमणराव ते गांधी' हा एकपात्री प्रयोग सादर करतात. या एकपात्रीतून 'चिमणराव' या मुंबई दूरदर्शनवरील लोकप्रिय मालिकेपासून सुरू झालेला प्रभावळकरांच्या कारकिर्दीचा प्रवास दृक-श्राव्य माध्यमातून उलगडत जातो. काही दुर्मीळ दृश्यफिती, प्रत्येक व्यक्तिरेखा सादर करताना अभिनेता म्हणून करावी लागलेली तयारी, संबंधित भूमिका साकारताना घडलेल्या रंजक कथा, मोजक्या भूमिकांचे उत्स्फूर्त सादरीकरण आणि कलाकार म्हणून घडविणारे, समृद्ध करणारे अनुभव... असे प्रभावळकरांच्या व्यक्तिरेखेचे अनेक अनवट पैलू या एकपात्रीच्या निमित्ताने सामोरे येतात.. चिमणराव, चेटकीण, नाना कोंबडीवाला, 'नातीगोती' नाटकातील काटदरे, 'चौकट राजा'मधील नंदू, 'सरकारनामा'मधील अण्णा यासारख्या अनेक व्यक्तिरेखा प्रभावळकर यांनी नर्मविनोदी शैलीत उलगडतात. तसेच, त्या भूमिका साकारतानाचे किस्से अन् काही संवेदनशील आठवणी सांगत ते प्रेक्षकांना अंतर्मुख करतात. हौशी आणि प्रायोगिक रंगभूमीवरुन ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर यांचा सुरु झालेला प्रवास आजही असाच सुरु आहे. वयाच्या ७४ व्या वर्षीही ते आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करीत आहेत. त्यांनी रंगवलेली प्रत्येक भूमिका वेगळी आणि प्रेक्षकांच्या कायम स्मरणात राहणारी आहे. आज दिलीप प्रभावळकरांचा वाढदिवस आहे. ४ ऑगस्ट १९४४ रोजी जन्मलेले प्रभावळकर १९७२ सालापासून अभिनयाशी जुळलेले आहेत.

# हेल्मेट सक्ती: स्वागत व आक्षेप

भारतात १९८८ च्या मोटार वाहन कायद्याच्या अंमलबजावणीपासून, दुचाकी चालक आणि मागे बसणारे प्रवासी या दोघांसाठीही हेल्मेट घालणे राष्ट्रीय स्तरावर कायद्याने बंधनकारक आहे. दि.१ ऑगस्ट,२०२६ पासून अकोल्यात हेल्मेट न परिधान केल्यास दंड आकारण्यात येत आहे. दुचाकी चालवताना हेल्मेट घालणे हा स्वतःच्या सुरक्षिततेसाठी सर्वात महत्त्वाचा निर्णय आहे.हे अपघाताच्या वेळी डोक्याला गंभीर दुखापत होण्यापासून वाचवते आणि अनेकदा जीवदान ही देऊ शकते.हेल्मेटमुळे जीवघेण्या दुखापतींपासून बचाव,चेहरा आणि डोळ्यांचे रक्षण,व कडक ऊन, पाऊस आणि वाऱ्यापासून रक्षण होते.

पण त्याला काही जणांनी विरोध दर्शविला आहे. महाराष्ट्रात,पुणे शहरात पण सन २०१८/२०१९ मध्ये जेव्हा हेल्मेट अनिवार्य करण्यात आले तेव्हा हेल्मेटला अनोख्या पद्धतीने विरोध करण्यात आला. हा विरोध इतका संघटित होता की, अंमलबजावणी मोहिमांविरुद्ध लढण्यासाठी नागरिक आणि राजकारण्यांनी 'हेल्मेट शक्ती विरोधी कृती समिती' नावाचा एक अधिकृत गट स्थापन केला होता. पुणेकरांनी अनेक प्रमुख कारणांमुळे या आदेशाला विरोध केला त्यात सर्वात सामान्य स्थानिक युक्तिवाद असा आहे की, पुण्यातील अरुंद गल्ल्या, प्रचंड वाहतूक आणि तीव्र अडथळ्यांमुळे जास्त वेगाने गाडी चालवणे अशक्य होते. नागरिकांचा युक्तिवाद होता की, ते सहसा ताशी १० ते २० किमी वेगाने वाहतुकीतून हळू हळू जात असल्यामुळे, शहराच्या हद्दीत डोक्याला गंभीर दुखापत होण्याचा धोका खूपच कमी असतो, ज्यामुळे जड हेल्मेट अनावश्यक वाटते. तसेच त्यांनी वाहतूक पोलीस अपघातांच्या मूळ कारणांवर लक्ष देण्याऐवजी दंडाच्या माध्यमातून महसूल मिळवण्यासाठी हेल्मेट मोहिमाचा वापर करतात. स्थानिक लोकांचे म्हणणे होते की सरकारने प्रथम मोठे खड्डे आणि तुटलेले रस्ते दुरुस्त करणे,सदोष, अरुंद रस्त्यांची रचना आणि दुभाजक सुधारणे इत्यादींवर लक्ष



देऊन,आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करूनच मग हेल्मेटची सक्ती करावी. कित्येक जण ही छळाची भावना मानतात. अनेक नागरिक हेल्मेट सक्तीला वैयक्तिक स्वातंत्र्यात सरकारचा अनावश्यक हस्तक्षेप मानतात. तसेच काहींच्या मते,जसे पगडी घालणारे शीख व्यक्तींना कायद्याने सूट आहे, तशीच सूट सर्व दुचाकीस्वारांना देऊन त्यांना निवडीचा अधिकार असावा. काही जणांच्या मते रोजच्या, कमी अंतराच्या शहरी प्रवासासाठी हेल्मेट घातल्याने विशिष्ट आरोग्य समस्या निर्माण होतात. जड हेल्मेटमुळे सर्व्हायकल स्पॉन्डिलायटिस (मानदुखी) वाढते, उष्ण हवामानात केस गळतात आणि दाट वाहतुकीत बाजूची दृष्टी व ऐकण्याची क्षमता धोकादायक रित्या बाधित होते. या सर्व बाबी अकोल्याला पण लागू होतात असे कित्येकांचे मत आहे. मग काय अकोल्यासारख्या लहान शहरात हेल्मेट अनिवार्य नसावे?केंद्रीय मोटार वाहन कायद्यानुसार देशभरात सर्व ठिकाणी हेल्मेट घालणे बंधनकारक आहे. कमी वेग किंवा कमी गर्दी असल्यामुळे लहान शहरांत अपघात होणार नाहीत,हा एक मोठा गैरसमज आहे. अकोला शहरांमधील रस्त्यांवर खड्डे आणि गतिरोधक जास्त असल्याने गाडी घसरण्याची शक्यता जास्त आहे.गाडीचा वेग जरी २० किमी/तास असला तरी पडल्यास डोक्याला गंभीर किंवा कायमस्वरूपी इजा होऊ शकते. त्यामुळे आज जरी सक्ती वाटली, थोडी खर्चिक वाटली तरी स्वतःच्या सुरक्षेसाठी प्रत्येकाने कायद्याचा सन्मान करून दुचाकी चालवताना हेल्मेट परिधान करणेच उचित वाटते. तसेच मोटार वाहन कायदाच्या कलम १२९ नुसार, ४ वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या प्रत्येक दुचाकी चालक आणि मागे बसणाऱ्या (पिलियन) व्यक्तीला हेल्मेट घालणे सक्तीचे आहे,त्याचे पण पालन करावे,असे वाटते.

**प्रा.डॉ.संजय खडक्कार**
**माजी तज्ज्ञ सदस्य,**

# भारतातील पहिल्या स्किन बँकेची सायन मुंबई येथे स्थापना

भारतातील पहिली स्किन बँक (त्वचा पेढी) ही मुंबईतील सायन हॉस्पिटल येथे ४ ऑगस्ट २००० मध्ये सुरू करण्यात आली. विशेष म्हणजे यापूर्वी १९७२ मध्ये वडिया रुग्णालयात प्रयत्न झाला होता, परंतु सायन हॉस्पिटलची बँक अधिकृतपणे यशस्वी ठरली. मृत्यूनंतर (किंवा ब्रेन डेड व्यक्तीनंतर) दान केलेली त्वचा सुरक्षितपणे गोळा करून, त्यावर प्रक्रिया करून ती साठवून ठेवण्याचे ठिकाण. दात्याच्या मृत्यूनंतर ६ तासांच्या आत त्वचा काढणे आवश्यक असते. ही त्वचा योग्य रसायनांमध्ये (ग्लिसरॉल आणि प्रतिजैविके) विशिष्ट तापमानाला तब्बल ५ वर्षांपर्यंत सुरक्षित ठेवली जाऊ शकते. ५० ते ६० टक्क्यांहून अधिक भाजलेल्या रुग्णांवर स्वतःची त्वचा उपलब्ध नसेल तेव्हा ही त्वचा तात्पुरती उपयोगात आणली जाते. ही त्वचा जैविक मलमपट्टी (बायोलॉजिकल ड्रेसिंग) म्हणून काम करते, ज्यामुळे जंतुसंसर्ग रोखता येतो आणि वेदना कमी होतात. त्वचा प्रत्यारोपणामुळे रुग्णांचे जीव वाचण्याचे प्रमाण वाढते. त्वचा दानाची प्रक्रिया अत्यंत सोपी आणि सुरक्षित असते. यामध्ये मृत शरीराला कोणत्याही प्रकारची विद्रूपता (डिफिगरमेंट) येत नाही. त्वचा दानासाठी कोणतेही वयाचे बंधन नसते. साधारणपणे १८ ते १०० वर्षे वयाची कोणतीही व्यक्ती त्वचा दान करू शकते. एड्स, हिपॅटायटीस बी आणि सी, सिफिलीस, रक्ताचा कर्करोग किंवा त्वचेचा संसर्ग असलेल्या व्यक्ती त्वचा दान करू शकत नाहीत. व्यक्तीच्या मृत्यूनंतर ६ तासांच्या आत त्वचा काढणे आवश्यक असते. मृत्यूनंतर जवळच्या नातेवाईकांची लेखी संमती आवश्यक असते. माहिती मिळताच स्किन बँकची टीम मृत व्यक्तीच्या घरी किंवा रुग्णालयात पोहोचते.विशेष उपकरणाच्या मदतीने शरीराच्या विशिष्ट भागाची (प्रामुख्याने पाठीचा भाग, मांड्या आणि पाय) त्वचा काढली जाते. यामध्ये त्वचेचा फक्त वरचा अत्यंत पातळ थर काढला जातो. त्यामुळे अंतर्गत अवयव किंवा हाडांना धक्का लागत नाही. मृत्यूनंतर रक्ताभिसरण थांबत असल्यामुळे त्वचा काढताना रक्तस्त्राव होत नाही. त्वचा काढलेल्या भागावर टीमद्वारे व्यवस्थित मलमपट्टी केली जाते. कपडे घातल्यानंतर शरीराचा कोणताही भाग कापलेला किंवा बदललेला दिसत नाही. मृतदेहाचा चेहरा किंवा हात यांसारख्या उघड्या भागांना स्पर्शही केला जात नाही. गोळा केलेल्या त्वचेची लॅबमध्ये तपासणी केली जाते आणि ती जंतूविरहित केली जाते. ही त्वचा ग्लिसरॉलमध्ये ठेवून ४ ते ५ वर्षांपर्यंत स्किन बँकेत सुरक्षित ठेवली जाते. भारतात त्वचा दानाबद्दल अनेक गैरसमज आणि अंधश्रद्धा आहेत, ज्यामुळे अवयव दानाच्या तुलनेत त्वचा दानाचे प्रमाण खूप कमी आहे. १) मृतदेह विद्रूप किंवा कुरूप दिसतोगैरसमज : त्वचा काढल्यामुळे मृतदेह भयानक किंवा विद्रूप दिसेल अशी भीती नातेवाईकांना असते. २) सत्य: त्वचा फक्त पाठीचा भाग, मांड्या आणि पाय या कपड्यांखाली झाकलेल्या भागांवरूनच काढली जाते. चेहरा, हात किंवा उघड्या भागाला स्पर्शही केला जात नाही. त्वचा काढल्यानंतर त्या भागावर व्यवस्थित मलमपट्टी केली जाते. त्यामुळे मृतदेह अजिबात विद्रूप दिसत नाही. ३) तीव्र रक्तस्त्राव होतो किंवा हाडे दिसतात : त्वचा काढताना खूप रक्त वाहते आणि अंतर्गत अवयव किंवा हाडे उघडी पडतात, हा गैरसमज आहे. मृत्यूनंतर शरीरातील रक्ताभिसरण पूर्णपणे थांबते, त्यामुळे त्वचा काढताना एक थेंबही रक्त येत नाही. तसेच, त्वचेचा फक्त वरचा अत्यंत पातळ थर (फक्त ०.३ ते ०.४ मिमी) काढला जातो. मांस किंवा हाडांना कोणताही धक्का लागत नाही.
४) पुढच्या जन्मी त्वचा नसलेले शरीर मिळेल : धार्मिक अंधश्रद्धेमुळे अनेकांना वाटते की या जन्मात त्वचा दान केल्यास पुढच्या जन्मात व्यक्ती त्वचा नसलेले किंवा कुरूप शरीर घेऊन जन्माला येईल. सर्वच मुख्य धर्म मानवी सेवा आणि दानाला सर्वोच्च स्थान देतात. जळलेल्या रुग्णाचा जीव वाचवणे हे सर्वात मोठे पुण्य मानले जाते. धार्मिक ग्रंथांमध्ये अशा प्रकारच्या कोणत्याही पुनर्जन्माच्या भीतीचा उल्लेख नाही. ५) अंत्यसंस्काराला उशीर होतो : स्किन बँकच्या टीमला यायला वेळ लागेल आणि यामुळे अंत्यसंस्काराचे विधी लांबणीवर पडतील. माहिती मिळाल्यानंतर स्किन बँकची टीम तात्काळ पोहोचते. त्वचा काढण्याची संपूर्ण प्रक्रिया अवघ्या १५ ते २० मिनिटांत पूर्ण होते. त्यामुळे अंत्यसंस्काराला अजिबात उशीर होत नाही.
६) केवळ रुग्णालयातच त्वचा दान करता येते : व्यक्तीचा मृत्यू रुग्णालयात झाला तरच त्वचा दान शक्य आहे, घरी नाही. मृत्यू घरी झाला असेल तरीही त्वचा दान करता येते. स्किन बँकची टीम सर्व आवश्यक उपकरणांसह मृत व्यक्तीच्या घरी येऊन अत्यंत आदरपूर्वक ही प्रक्रिया पूर्ण करते.



सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. ४ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com




# राजेश्वराची सुंदर आरास, मंदिरावर रोषणाई.....





अकोला. श्री राजराजेश्वराचे सोमवारी रात्री उशिरापर्यंत भाविकांनी दर्शन घेतले. हिंदी भाषिकांचा पहिला श्रावण सोमवार असल्याने मोठ्या प्रमाणात गर्दी होती. श्री राजराजेश्वराची सुंदर आरास केली होती. तसेच मंदिरावर रोषणाई करण्यात आली होती.
श्रावण महिन्यात राजेश्वर मंदिरात भाविकांची गर्दी होणार असल्याने मंदिर व्यवस्थापनाने सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

# हेल्मेटची मागणी वाढली, गुणवत्ता पाहणे आवश्यक

## रामदासपेठ पोलिसांनी हेल्मेट घेतले ताब्यात

प्रतिनिधी ४ ऑगस्ट

**अकोला:** १ ऑगस्ट पासून अकोला शहरात हेल्मेट सक्ती करण्यात आली आहे. हेल्मेट शिवाय फिरणाऱ्या वाहन चालकांना पहिल्या दिवसापासून हजार रुपये दंड ठोठावला जात आहे. हेल्मेटची विक्री वाढली आहे. बनावट हेल्मेट ग्राहकांच्या मस्तकी मारले जाऊ नये याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. अशी ओरड झाल्यामुळे रामदासपेठ पोलिसांनी हेल्मेट तपासणी साठी ताब्यात घेतले.
रस्ते अपघातांमध्ये डोक्याला होणाऱ्या गंभीर दुखापतींपासून वाचवण्यासाठी हेल्मेट हे सर्वात महत्त्वाचे सुरक्षा साधन आहे.



वेळी सुरक्षिततेऐवजी प्राणांवर बेतू शकते.
लोकल किंवा रस्त्यावर मिळणाऱ्या स्वस्त हेल्मेटमध्ये वापरलेले प्लॅस्टिक अपघाताचा धक्का सोसू शकत नाही आणि दर्जाचे नसेल, तर डोक्याला बसणारा शॉक (धक्का) कमी होत नाही. दुय्यम दर्जाचे हेल्मेट अपघाताच्या वेळी डोक्यावरून निघून जाण्याची शक्यता जास्त असते. गुणवत्ता तपासण्यासाठी 4151 हा कोड असलेला ISI मार्क असणे अनिवार्य आहे.
हेल्मेटचा बेल्ट व्यवस्थित बसतोय का आणि लॉक मजबूत आहे का हे तपासा. हेल्मेटच्या आतमध्ये 'EPS' (Expanded एकदम व्यवस्थित बसले पाहिजे; ते जास्त सैल किंवा जास्त घट्ट नसावे.
जर हेल्मेटला एकदा मोठा धक्का किंवा अपघात बसला असेल, तर वरून ते चांगले दिसत असले तरी आतून त्याची क्षमता संपलेली असते. त्यामुळे ते तात्काळ बदलावे. फक्त पोलिसांच्या दंडापासून वाचण्यासाठी हलके किंवा कडक नसलेले नकली हेल्मेट वापरणे जिवाशी खेळण्यासारखे आहे. चांगले आणि प्रमाणित हेल्मेट ही केवळ एक खरेदी नसून तो तुमच्या जिवाचा विमा आहे, याकडे लक्ष वेधले जात आहे.

# ढाबे व हॉटेलवर केवळ दहा मिनिटे थांबेल महामंडळाची बस

प्रतिनिधी ४ ऑगस्ट

**अकोला:** महामंडळाच्या बस गाडीने प्रवास करणाऱ्या अनेक प्रवाशांची तक्रार होती की महामंडळाच्या बस ड्रायव्हर व कंडक्टरच्या मर्जीतील धाबे व हॉटेलवर जास्त वेळ बसेस थांबत असल्याने प्रवासाच्या वेळेचा दुरुपयोग होत आहे. त्यामुळे लांब पल्ल्याच्या एसटी बसेसची वेळेवर पोहोचण्याची खात्री करण्यासाठी महामंडळाने एक मोठे पाऊल उचलले आहे. आता, एसटी बस चालक आणि वाहकांना कोणत्याही मान्यताप्राप्त हॉटेल किंवा ढाब्यावर १० मिनिटांपेक्षा जास्त वेळ बस थांबवण्याची परवानगी दिली जाणार नाही. या वेळेच्या मर्यादेचे उल्लंघन केल्यास, चालक किंवा वाहकावर कठोर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल. हा नवीन आदेश नागपूर, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर, पुणे, कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर अकोला सह राज्यभरातील सर्व एसटी विभागांमध्ये लागू करण्यात आला आहे.

**उड्डाण पथके देखरेख करतील:**
नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्यासाठी, एसटी महामंडळाने विशेष भरारी पथके स्थापन केली आहेत. ही पथके हॉटेल्स आणि ढाब्यांची अचानक तपासणी करतील आणि १० मिनिटांच्या मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या चालक व वाहकांवर तात्काळ कारवाईसाठी अहवाल सादर करतील. या पावलामुळे बसेस वेळेवर त्यांच्या गंतव्यस्थानी पोहोचतील आणि प्रवाशांचा वेळ वाचेल, अशी महामंडळाला आशा आहे.

# डाबकी रोड विस्तारीकरणात मुरुमऐवजी मातीचा वापर?

प्रतिनिधी ४ ऑगस्ट

**अकोला:** शहरातील महत्त्वाच्या डाबकी रोडच्या विस्तारीकरणाच्या कामावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. कोट्यवधी रुपयांच्या या विकासकामामध्ये दर्जेदार साहित्याचा वापर करण्याऐवजी मुरूमाऐवजी सर्रास मातीचा वापर केला जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे या रस्त्याच्या गुणवत्तेबाबत शंका निर्माण झाली असून, संबंधित कामाची तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.
डाबकी रोडवरील रस्ता विस्तारीकरणाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. या कामासाठी रस्त्याच्या एका बाजूचे मोठ्या प्रमाणावर खोदकाम करण्यात आले आहे. खोदकामानंतर रस्त्याच्या



भरावासाठी तांत्रिक निकषांनुसार दर्जेदार मुरूमाचा वापर करणे आवश्यक असते. मात्र, प्रत्यक्षात भराव करताना मुरूमाऐवजी साधी माती टाकली जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. काही ठिकाणी मातीचे थर टाकून त्यावर वरवरची दाबणी केली जात असल्याचेही सांगितले जात आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अशा प्रकारे मातीचा वापर करून करण्यात येणारा भराव पावसाळ्यात टिकाव धरणार नाही. पावसाचे पाणी साचल्यास माती वाहून जाण्याची, रस्ता खचण्याची तसेच भविष्यात मोठे खड्डे पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी शासनाचा निधी वाया जाण्याबरोबरच नागरिकांच्या जीवितालाही धोका निर्माण होऊ शकतो. या कामामध्ये तांत्रिक मानकांचे पालन केले जात आहे का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांकडून कामाची नियमित पाहणी होत आहे का, तसेच वापरल्या जाणाऱ्या साहित्याची गुणवत्ता तपासली जात आहे का, अशी विचारणा नागरिक करत आहेत. केवळ काम पूर्ण झाल्याचे दाखविण्यासाठी घाईघाईत आणि थातूरमातूर पद्धतीने काम सुरू असल्याचा आरोपही करण्यात येत आहे.
स्थानिक रहिवाशांनी सांगितले की, रस्त्याच्या भरावासाठी वापरले जाणारे साहित्य पाहिल्यानंतर अनेकांनी याबाबत आक्षेप घेतला. मुरूमाऐवजी माती टाकली जात असल्याने संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन प्रत्यक्ष पाहणी करावी, कामाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवावेत आणि निकृष्ट दर्जाचे काम आढळल्यास संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.
डाबकी रोड हा शहरातील अत्यंत वर्दळीचा मार्ग असून या रस्त्यावरून दररोज हजारो वाहने ये-जा करतात. त्यामुळे या रस्त्याचे काम दर्जेदार आणि टिकाऊ होणे अत्यावश्यक आहे.

# पीक कर्जासाठी आता कोरे चेक घेतले जाणार

प्रतिनिधी ४ ऑगस्ट





अडगाव :पीक कर्ज मंजूर करताना शेतकऱ्यांकडून कोऱ्या चेकवर सही करून घेण्याच्या प्रथेविरोधात सुरू असलेल्या आंदोलनानंतर सेंट्रल बँक ऑफ इंडिया, अडगाव बु. शाखेने मोठा निर्णय घेतला आहे.
बँकेने लेखी परिपत्रक काढून स्पष्ट केले आहे की _"यापुढे कोणत्याही शेतकऱ्याकडून पीक कर्जासाठी कोणत्याही प्रकारचा कोरा चेक घेतला जाणार नाही. खरं तर सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिवाजीनगर शाखा पीक कर्ज देताना शेतकऱ्यांकडून 5-5 कोरे चेक सही करून घेत होती. शेतकरी संघटने याला शेतकऱ्यांच्या अडचणीचा गैरफायदा असल्याचे म्हटले होते. भीतीपोटी अनेक शेतकरी हे चेक देण्यास भाग पडत होते.
हा अन्याय गांभीर्याने घेत *शेतकरी संघटनेचे नेते गोपाल चांडक* यांनी 4 दिवसांपूर्वी बँक व्यवस्थापकांना लेखी निवेदन दिले होते आणि ही प्रथा त्वरित बंद करावी अशी मागणी केली होती. गोपाल चांडक यांच्या तडफदार पाठपुराव्याला यश आले असून बँक प्रशासनाने त्यांची मागणी मान्य करून परिपत्रक जारी केले आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. समस्त शेतकरी गावकरी मंडळाने सेंट्रल बँक ऑफ इंडिया प्रशासनाचे आणि गोपाल चांडक व सर्व पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

# 7 ऑगस्टला महापालिकेची झाडाझडती

प्रतिनिधी ४ ऑगस्ट

**अमरावती :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना अभिप्रेत असणाऱ्या गतिमान शासन पारदर्शी प्रशासन अंमलबजावणीसाठी राज्यसभा खासदार डॉ अनिल बोंडे व विधानपरिषद आमदार प्रवीण पोटे पाटील शुक्रवार 7 ऑगस्ट रोजी घेणार अमरावती महानगर पालिकेची झाडाझडती घेणार आहे.
अमरावती, बडनेरा शहरातील नागरिकांद्वारे प्राप्त तक्रारींचे निराकरण,विविध समस्या निवारण्यासाठी करावयाच्या उपाययोजना,मनपा चे उत्पन्न वाढवून आर्थिक सक्षमता आणणे,प्रलंबित विकासकामांचा आढावा घेणे आदींसाठी खासदार डॉ अनिलजी बोंडे,आमदार प्रवीण पोटे पाटील,महापौर श्रीचंद तेजवानी यांच्यासह पदाधिकारी यांच्या




उपस्थितीत मनपा आयुक्त गोंदवले व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत होणार मॅरेथॉन बैठक पार पडणार आहे. अमरावती मनपा क्षेत्रात स्वच्छता, उघड्यावर होणारी मांस विक्री थांबविणे,हॉकर्स झोन निश्चित करून रजिस्टेशन, पादचारी फुटपाथ मोकळे करणे,शहरातील वाहतुकीला शिस्त लावणे,प्रत्येक चौकातील ट्रॅफिक सिग्नल चा कालावधी वाढवून वाहतूक सुरक्षित व सुरळीत करणे,मनपा क्षेत्रातील खाजगी दवाखान्यातील मेडिकल वेस्ट संकलन व विल्हेवाट, हॉटेल्स, लॉन मधील उरलेले अन्न व टाकावू पदार्थ संकलन व विल्हेवाट,शहरातील प्रत्येक प्रभाग, प्रत्येक वार्डातील कचरा संकलन व विल्हेवाट,शहरातील वृक्ष कटाई वर नियंत्रण ,शहरातील मनपा मालकीच्या मोकळ्या जाग,सार्वजनिक मैदाने व रिकामे प्लॉट याची स्वच्छता,पावसाळ्यात साथीचे आजार होऊ नये म्हणून करावयाचे उपाययोजना, सार्वजनिक उद्याने यांची निगा राखणे, अतिक्रमण विभाग कार्यपद्धती,शहर सौंदर्यीकरण व देशी झाडे लावणे,मनपा कर्मचाऱ्यांना येणाऱ्या अडचणी, मनपाचे मनुष्यबळ कंत्राट,मनपा द्वारे मंजूर,प्रलंबित विकासकामे यांचा दर्जा,गुणवत्ता व त्यावर होणारा खर्च,खाजगी कंत्राटदाराद्वारे होणारा मनपा बाह्य मनुष्यबळ पुरवठा आदी महत्त्वपूर्ण बाबींचा आढावा घेण्यात येणार आहे.

# सोनखास येथील शेतकरी आठ वर्षापासून जमीन मोबदल्याच्या प्रतीक्षेत

## न्याय न मिळाल्यास 13 ऑगस्टपासून उपोषण

प्रतिनिधी ४ ऑगस्ट

**वाशिम :** जिल्ह्यातील सोनखास येथील सहा शेतकऱ्यांची जमीन राष्ट्रीय महामार्ग १६१ मध्ये गेली आहे. मात्र शेतीच्या गट नंबर मधील तफावत असल्याने गेल्या ८ वर्षापासून शेतकरी जमिनीचा मोबदल्याच्या प्रतिक्षेत आहे. त्यामुळे संतप्त झालेले शेतकऱ्यांनी १३ ऑगस्टपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला असून मोबदला मिळेपर्यंत उपोषण सुरूच ठेवणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले आहे.
वाशिम तालुक्यातील सोनखास येथील सहा शेतकरी गेल्या आठ वर्षांपासून राष्ट्रीय महामार्ग १६१ साठी संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्याच्या प्रतीक्षेत आहेत. शेतीच्या गट नंबरमधील तफावतीमुळे हा मोबदला रखडला होता. दोन वर्षांपूर्वी भूमी अभिलेख विभागानं गट नंबरमध्ये दुरुस्ती केली. आणि त्यानंतर दुरुस्तीचा अहवालही शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे सादर केला. मात्र, तरीही शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला अद्याप मिळाला नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी येत्या १३ ऑगस्टपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिलाय. मोबदला मिळेपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# केंद्रीय विद्यालय निवड यादीची पालकांना प्रतीक्षा



प्रतिनिधी ४ ऑगस्ट

**अकोला:** शहरातील हरीहरपेठ येथील टाऊन हायस्कूलच्या परिसरात नुकतेच केंद्रीय विद्यालय सुरू करण्यात आले आहे.
या विद्यालयातील प्रवेशासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची पहिली निवड यादी सोमवारी (४ ऑगस्ट) प्रसिद्ध होणार असल्याची माहिती पालकांना देण्यात आली होती.
त्यामुळे सोमवारी सकाळपासूनच अनेक पालक आपल्या पाल्यांच्या प्रवेशाबाबत माहिती मिळविण्यासाठी शाळेत पोहोचले. मात्र, दिवसभर प्रतीक्षा करूनही निवड यादी जाहीर करण्यात आली नाही. यादी प्रसिद्ध न झाल्याने पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला. अखेर मंगळवारी पुन्हा सकाळपासूनच मोठ्या संख्येने पालक शाळेच्या परिसरात दाखल झाले.
आपल्या मुलाचे नाव निवड यादीत आहे का, याची उत्सुकता प्रत्येक पालकाच्या चेहऱ्यावर दिसून येत होती.
अनेक पालकांनी शाळा प्रशासनाकडे वारंवार विचारणा करत, "निवड यादी नेमकी केव्हा लागणार?" असा प्रश्न उपस्थित केला.

# नागपूर मुंबई एक्सप्रेसमध्ये पाणी टंचाई

प्रतिनिधी ४ ऑगस्ट

**अकोला:** अकोला मार्गे जाणाऱ्या नागपूर एक्सप्रेस मध्ये पाणीपुरवठा बंद असल्याची तक्रार आहे. या एक्सप्रेसने हजारो प्रवासी रोज येणे जाणे करतात. मात्र, रेल्वे प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.
कोट्यवधी रुपये रेल्वे प्रशासनाला प्रवाशांच्या माध्यमातून मिळतात. मात्र, चांगल्या दर्जाच्या सुविधा रेल्वे प्रशासन प्रवाशांना मिळत नसल्याचे आढळून येत आहे. तसेच नागपूर एक्सप्रेसच्या सामान्य डब्यामध्ये अस्वच्छतेचे साम्राज्य असून ठिकठिकाणी कचरा साचल्यामुळे अस्वच्छता



दिसते. नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे तसेच रेल्वेतील अग्निशामक सिलेंडर सुद्धा एक्सपायर झाले असून नागपूर एक्सप्रेस मधील सामान्य डब्यातील चार पंखे नादुरुस्त आहे. तसेच सामान्य डब्यामध्ये चार्जिंग करण्यासाठी दिलेले बोर्ड सुद्धा दोन ठिकाणी बंद अवस्थेत आहे. त्यामुळे रेल्वेमध्ये मोबाईल स्विच ऑफ झाल्यास सिटी एरिया येईपर्यंत सामान्य नागरिकांना मोबाईलचा वापर करता येत नाही. रेल्वेमध्ये धूम्रपान करणे हा कायद्याने गुन्हा असताना काही गुंड प्रवृत्तीचे व्यक्ती रेल्वेमध्ये धूम्रपान करत असल्याचे आढळून येत आहे. काही दिवसांपूर्वी रेल्वे प्रशासनाने धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींविरोधक कारवाई करण्यासाठी पथक स्थापन केले होते. सदर पथकामार्फत रेल्वेमध्ये दंडात्मक कार्यवाही होत नसल्यामुळे धूम्रपान करण्याचे प्रकार नागपूर एक्सप्रेस मध्ये वाढत आहे. सार्वजनिक ठिकाणी तंबाखू व गुटखा फोन रेल्वेमध्ये पिचकारी थुंकणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत असल्यामुळे रेल्वे मध्ये अस्वच्छता दिसते. योग्य व दर्जेदार चांगला सुविधा देण्यास रेल्वे प्रशासन अपयशी ठरत असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे या सर्व प्रकाराची योग्य ती चौकशी करून नागपूर एक्सप्रेस सह सर्व एक्सप्रेस रेल्वे मध्ये चांगल्या दर्जाच्या सुविधा देण्याची मागणी ऋषभ राजेश काळे, शहर संभाजी ब्रिगेड अकोला यांनी रेल्वे प्रशासनाकडे ऑनलाइन तक्रारीच्या माध्यमातून मागणी केली आहे.

# शरद नहाटे यांना मानाचा 'वसंतराव नाईक पुरस्कार'



प्रतिनिधी ४ ऑगस्ट

**अकोट :** तालुक्यातील जळगाव नहाटे येथील प्रयोगशील व प्रगतशील शेतकरी शरद नहाटे यांना त्यांच्या उत्कृष्ट व नाविन्यपूर्ण कृषी कार्यासाठी अत्यंत मानाचा समजला जाणाऱ्या राज्य शासनाच्या 'कै. वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने' गौरविण्यात आले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल जळगाव नहाटे गावासह संपूर्ण अकोट तालुक्याच्या कृषी क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, ते परिसरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणास्थान ठरले आहेत.याच पार्श्वभूमीवर, शरद नहाटे यांच्या निवासस्थानी जाऊन डिक्कर परिवाराच्या वतीने त्यांचा अत्यंत उत्साहात यथोचित सत्कार करण्यात आला. या सत्कार प्रसंगी त्यांना शाल व श्रीफळ प्रदान करून त्यांच्या कार्यावर कौतुकाची थाप देण्यात आली.
या आनंद सोहळ्यात आणि सत्काराच्या प्रसंगी प्रशांत डिक्कर, शिवराम डिक्कर, आशिष शेळके, रोशन देशमुख आणि विठ्ठल नहाटे यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर व



# 1.5 कोटींच्या इनोव्हावरून सीएम फडणवीसांचा बीएमसीला दणका

प्रतिनिधी ४ ऑगस्ट

## जनतेचा पैसा वाया घालवू नका




**मुंबई:** सहा वरिष्ठ राजकीय पदाधिकाऱ्यांच्या अधिकृत गाड्या बदलण्यासाठी सुमारे १.५ कोटी रुपये खर्च करण्याच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (बीएमसी) प्रस्तावावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केल्यानंतर, हा प्रस्ताव मागे घेतला जाण्याची शक्यता आहे. या प्रस्तावावर प्रतिक्रिया देताना सीएम फडणवीस यांनी महानगरपालिकेला अनावश्यक खर्चापेक्षा जनहिताला प्राधान्य देण्याचे निर्देश दिले. जनतेचा पैसा केवळ विकासकामांवरच खर्च केला पाहिजे. उधळपट्टी थांबवा आणि लोकांच्या गरजांवर लक्ष केंद्रित करा, असे मुख्यमंत्री म्हणाले. बीएमसी आता हा प्रस्ताव मागे घेण्याचा विचार करत आहे. ३० जुलै २०२६ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत उपमहापौर, सभागृह नेते, विरोधी पक्षनेते आणि तीन प्रमुख समित्यांच्या अध्यक्षांसाठी सहा नवीन 'टोयोटा इनोव्हा क्रिस्टा' गाड्या उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आणि त्यानंतर हा वाद निर्माण झाला. काँग्रेसचे गटनेते अश्रफ आझमी यांनी या हालचालीला विरोध केला. महानगरपालिका आर्थिक अडचणींचा सामना करत असताना सध्याच्या महिंद्रा स्कॉर्पिओ-एन, एसयूव्ही गाड्या बदलण्याची गरज काय, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. त्यांनी या प्रस्तावाला अनावश्यक खर्च म्हटले आणि बीएमसी ला आर्थिक शिस्त पाळण्याचे आवाहन केले.

हा मुद्दा लवकरच राजकीय वादात रूपांतरित झाला; भाजपनेत्यांनी विरोधकांवर दुटप्पीपणाचा आरोप केला. भाजपचे गटनेते गणेश खाणकर यांनी दावा केला की, सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी सार्वजनिकरीत्या विरोध करण्यापूर्वी या प्रस्तावावर चर्चा केली होती आणि त्यांच्या संमतीनेच तो मंजूर करण्यात आला होता. यापुढे, अशा प्रकारचे वाद निर्माण होऊ नयेत म्हणून, कोणताही प्रस्ताव मंजूर होण्यापूर्वी त्यावर सर्व पक्षीय नेत्यांच्या स्वाक्षऱ्या असतील याची मी खात्री करेन, असे खाणकर म्हणाले. स्थायी समितीचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनीही या प्रस्तावाचे समर्थन केले. त्यांनी आरोप केला की, विरोधी पक्षाच्या सदस्यांना या निर्णयाची पूर्ण कल्पना होती आणि चर्चेदरम्यान त्यांनी त्याला सहमती दर्शवली होती. टीकेला उत्तर देताना खाणकर यांनी स्पष्ट केले की, बीएमसीने ही वाहने थेट खरेदी करण्याचा प्रस्ताव मांडला नव्हता, तर ती 'वेट लीज' तत्त्वावर भाड्याने घेण्याचा विचार होता; या पद्धतीत महापालिका केवळ इंधन आणि चालकाचा खर्च उचलते. त्यांनी वाहनांबाबत एकसमान धोरण असावे अशी मागणीही केली आणि सुचवले की, महापौर व महापालिका आयुक्त वगळता इतर सर्व वरिष्ठ लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांना एकाच श्रेणीतील वाहने पुरवली जावीत.

# सट्टा ॲपला विरोध करणाऱ्या क्रिएटरचे अपहरण, 24 तासांत 4 आरोपी जेरबंद



प्रतिनिधी ४ ऑगस्ट

मुंबई: एका चिनी सट्टेबाजीच्या ॲपचा प्रचार करणाऱ्या इन्स्टाग्राम रील क्रिएटर्सना विरोध केल्यामुळे एका सोशल मीडिया क्रिएटरला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागले. गेल्या ८ महिन्यांपासून तो अशा क्रिएटर्सविरुद्ध (रोस्ट) आणि प्रत्युत्तर देणारे व्हिडीओ बनवून जनजागृती करत होता.

पवई पोलिसांच्या माहितीनुसार, याच वैमनस्यातून रविवारी, (२ऑगस्ट) त्याचे अपहरण करण्यात आले आणि चालत्या गाडीत त्याला बेदम मारहाण करण्यात आली. तक्रार मिळाल्यानंतर 24 तासांच्या आत पोलिसांनी चार आरोपींना अटक केली. डीसीपी दत्तात्रय नलावडे यांनी सांगितले की, पीडित व्यक्ती फ्रीलान्सर म्हणून काम करते आणि इन्स्टाग्राम रील्स बनवते. गेल्या काही महिन्यांपासून, काही लोकप्रिय रील क्रिएटर्स लोकांना एका चिनी सट्टेबाजीच्या ॲपचे डाउनलोड करण्यासाठी प्रोत्साहित करत होते. पीडिताला हे चुकीचे वाटले आणि त्याने जनजागृती करण्यासाठी अशा ॲप्सविरुद्ध रोस्ट व प्रत्युत्तर देणारे व्हिडीओ पोस्ट करण्यास सुरुवात केली. तपासात असे निष्पन्न झाले की, आरोपींपैकी एक असलेल्या प्रतिक शिंदे यानेही त्याच ॲपचा प्रचार केला होता. पीडिताने प्रतिक शिंदेच्या रील्सवरही टीका (रोस्ट) केली होती, ज्यामुळे त्यांच्यातील वाद वाढत गेला. सुमारे पाच-सहा महिन्यांपूर्वी, अनिकेत नावाच्या व्यक्तीने पीडिताला फोन करून सट्टेबाजीच्या ॲपविरुद्ध व्हिडीओ बनवणे थांबवण्याची धमकीही दिली होती. असे असूनही त्याने असे व्हिडीओ बनवणे सुरूच ठेवले, ज्यामुळे आरोपींच्या मनात त्याच्याबद्दल राग निर्माण झाला. पोलिसांच्या माहितीनुसार, घटनेच्या दिवशी संध्याकाळी पीडित पवईतील पंचकुटीर भागात गेला होता. तिथे, आरोपी यश बाब्रे याने त्याला बोलण्याच्या बहाण्याने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका काळ्या स्कॉर्पिओ गाडीजवळ बोलावले आणि बळजबरीने गाडीत बसवले. आरोप आहे की, गाडीत आधीच बसलेल्या व्यक्तींनी त्याचे तोंड दाबले, त्याचा गळा पायाने दाबून धरला, चाकूने जीवे मारण्याची धमकी दिली आणि त्याला मारहाण करण्यास सुरुवात केली. समीर कुचेकर ऊर्फ एसके या आरोपीनेही त्याला मारहाण केली. गाडी चालू असतानाच आरोपींनी पीडिताला काठ्यांनी मारहाण केली. पीडिताला प्रतिक शिंदे पुढच्या सीटवर बसलेला दिसला, तर अनिकेत गाडी चालवत होता. मारहाण करत असताना आरोपी त्याचा व्हिडीओही रेकॉर्ड करत होते, असा आरोप आहे. या घटनेदरम्यान, प्रतिक शिंदेने त्याला विचारले की, तो त्यांच्या सट्टेबाजीच्या ॲपविरुद्ध व्हिडीओ का बनवत होता. सुमारे तासभर मारहाण आणि धमकी दिल्यानंतर आरोपींनी त्याला कळंबोली येथे सोडून दिले आणि तेथून पळ काढला. या घटनेनंतर, पीडित व्यक्तीने सर्वप्रथम वैद्यकीय उपचार घेतले आणि त्यानंतर तक्रार नोंदवण्यासाठी पवई पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी त्वरित तपास सुरू करून सर्वप्रथम यश बाब्रे याला अटक केली. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने पुणे जिल्ह्यातील भिगवण येथे छापा टाकून प्रतिक शिंदे, अनिकेत आणि समीर कुचेकर यांनाही अटक केली. सर्व आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## मुंबईचे बदलते हवामान

प्रतिनिधी ४ ऑगस्ट

मुंबई : मुंबईचे हवामान प्रामुख्याने उष्णकटिबंधीय स्वरूपाचे असून ते वर्षभर उष्ण आणि दमट असते. अरबी समुद्राच्या सानिध्यामुळे येथील हवामानात आर्द्रता जास्त प्रमाणात असते. मुंबईत तीन प्रमुख ऋतू अनुभवण्यास मिळतात. उन्हाळा तापमान ३२एष्ट ते ३५एष्ट दरम्यान असते. उष्णता आणि प्रचंड आर्द्रतेमुळे हवामान घामाघूम करणारे असते. पावसाळा मान्सूनच्या काळात मुंबईत मुसळधार पाऊस पडतो.

## तुकाराम मुंढे अडचणीत येण्याची शक्यता, FDA ला दंड लावावा लागेल

प्रतिनिधी ४ ऑगस्ट

### लायसन्स निलंबन मागे न घेतल्याने कोर्टाचा संताप

**मुंबई :** एफडीएकडूनही नियमाप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याने व्यावसायिकांचे १५ दिवसांचे नुकसान झाले त्याचे काय? त्यामुळे आम्हाला एफडीएला दंड लावण्याचा विचार करावा लागेल', अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने अन्न व औषध प्रशासनाला सुनावले. 'नवी मुंबईतील याचिकाकर्त्या रेस्टॉरंटकडून शंभर टक्के नियमपालन होऊनही त्यांच्यावरील परवाना निलंबनाची कारवाई मागे का घेण्यात आली नाही? एफडीएकडूनही नियमाप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याने त्या व्यावसायिकांचे १५ दिवसांच्या नुकसानीचे काय? त्यामुळे आम्हाला एफडीएला दंड लावण्याचा विचार करावा लागेल', अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाला (एफडीए) सुनावले. त्याचवेळी त्या रेस्टॉरंटचा परवाना निलंबित करण्याचा एफडीएचा आदेशही रद्दबातल केला.

**शंभर टक्के पालन, तरी निलंबन आदेश कायम**

नवी मुंबईतील बेलापूर येथील हॉटेल पवन बार अँड रेस्टॉरंटने एफडीएच्या कारवाईला आव्हान दिले होते. 'एफडीएने २९ जून रोजी आमच्या रेस्टॉरंटची तपासणी करून नियमांचे ६३ टक्के पालन असल्याचे म्हटले आणि ३० जूनला परवाना निलंबित केला. त्याविरोधात आम्ही संबंधित प्राधिकरणाकडे अपिल केले. त्यामुळे १४ जुलैला पुन्हा तपासणी केली असता, शंभर टक्के पालन झाल्याचे प्रमाणपत्र दिले. तरी परवाना निलंबनाचा आदेश एफडीएने रद्द केला नाही', असे ॲड. मयूर खांडेपारकर व ॲड. सागर शेट्टी यांनी म्हटले.

आर्थिक नुकसानीबद्दल एफडीएला दंड?

याची प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे व न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठाने अत्यंत गंभीर दखल घेतली. 'एफडीए विभागाची समस्या ही आहे की, तो इतक्या वर्षांत झोपेत होता आणि आता जागा झाला आहे.

# वसई पोलिसांची मोठी कारवाई: 2 कोटींचे अंबरग्रीस जप्त; केरळमधील 5 जण गजाआड

प्रतिनिधी ४ ऑगस्ट



**वसई:** वन्यजीव तस्करीविरोधातील एका मोठ्या कारवाईत, वसई पोलिसांनी अंबरग्रीस (व्हेल माशाची उलटी) बेकायदेशीर व्यापारात गुंतलेल्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत २.०६ कोटी रुपये मूल्य असलेला २.०५८ किलो अंबरग्रीसचा साठा जप्त केला असून, या प्रकरणी चौघांना अटक करण्यात आली आहे.

वसई गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून प्रतिबंधित अंबरग्रीस (व्हेल माशाची उलटी) विक्रीसाठी आणणाऱ्या पाच जणांना अटक केली. आरोपींकडून सुमारे दोन किलो ५८ ग्रॅम वजनाचे अंबरग्रीस, एक दुचाकी आणि मोबाईल असा एकूण २ कोटी ७ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जी.जी. कॉलेजच्या मागील गेट परिसरात दोन व्यक्ती अंबरग्रीस विक्रीसाठी येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर गुन्हे शाखेने सापळा रचला. यावेळी दुचाकीवर आलेल्या उदित सातवसे (३८) आणि कृष्णाकांत देसाई (३४) यांना ताब्यात घेऊन त्यांच्या बॅगेची झडती घेतली असता सुमारे २ कोटी ५ लाख ८० हजार रुपये किमतीचे अंबरग्रीस आढळून आले.

चौकशीत मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी नवघर बस डेपो परिसरातून विशाल ठाकरे (२८), अकिल के. कृष्णा पी.व्ही. (२८) आणि सुहाद टी.पी. मोईद्दीन कोया (३२) यांनाही अटक केली. तपासात ही टोळी केरळ येथून अंबरग्रीस वसईत विक्रीसाठी आणल्याचे उघड झाले. या प्रकरणी वसई पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता तसेच वन्यजीव संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त निकेत कौशिक, अतिरिक्त पोलीस आयुक्त सचिन शिंदे आणि पोलीस उपायुक्त अशोक रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौरभी पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) प्रकाश मासाळ, पोलीस उपनिरीक्षक वैभव पवार, गुन्हे शाखेचे पथक आणि मांडवी वन परिक्षेत्राच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे केली.

# जनतेचा पैसा पाण्यात! बीएमसी मुख्यालयाच्या दुरुस्तीवर 10 वर्षात 120 कोटी खर्च

प्रतिनिधी ४ ऑगस्ट

## आता मुख्यालयासाठी आणखी 8.36 कोटी खर्च



**मुंबई :** गेल्या दहा वर्षांत मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील विस्तारित इमारतीच्या देखभाल आणि दुरुस्तीवर १२० कोटींहून अधिक रुपये खर्च करण्यात आले आहेत. केवळ एवढी मोठी रक्कम खर्च केल्याने इमारतीची स्थिती सुधारणार नाही. पुन्हा एकदा, इमारतीच्या दुरुस्तीच्या कामासाठी एकूण ८.३६ कोटी रुपये खर्च करण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे.

आशियाई प्रदेशातील सर्वात श्रीमंत मानल्या जाणाऱ्या मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकाजवळ असलेले महानगरपालिका मुख्यालय आहे. यामध्ये ब्रिटिशकालीन १२५ वर्षे जुनी दुमजली वारसा इमारत आणि तिला लागूनच १९६० मध्ये बांधलेली तळमजला व दुमजली इमारत यांचाही समावेश आहे.

किंवा विस्तारित दुमजली इमारतींच्या दुरुस्तीचे काम एका कुशल कंत्राटदाराकडून करून घ्यायचे होते. त्याचे कंत्राट आणि मुदत २०२३ मध्ये निश्चित केली जाईल. कंपनीने इतर दोन कंत्राटदारांकडून दुरुस्तीचे काम करून घेतले. त्यामुळे, असा अंदाज आहे की आतापर्यंत इमारतीच्या दुरुस्तीवर एकूण १२० कोटी रुपये खर्च झाले आहेत. फक्त, पावसाळ्यात पुन्हा इमारतीला गळती सुरू झाली आहे. इमारत बाहेरून जीर्ण झाली आहे. इमारतीमधील शौचालयाचे कामही प्रलंबित आहे. इमारती आणि दरवाजे व्हॉल्व्हने झाकलेले आहेत. महापालिकेने लाकडाला रंग देणे आणि देखभालीच्या कामासह इतर कामांसाठी पुन्हा एकदा नवीन निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. निविदा प्रक्रियेत सहभागी झालेल्या पाच कंत्राटदारांपैकी तो एक होता आणि त्याने अंदाजित रकमेपेक्षा २२ टक्के कमी, म्हणजेच ८.३६ कोटी रुपयांच्या रकमेत काम करण्याची तयारी दर्शवली आणि त्यामुळे तो पात्र ठरला. महिंद्रा रियल्टर्स अँड इन्फ्रास्ट्रक्चर लि. या कंत्राटदाराला कंत्राट देण्याचे ठरले आहे. संबंधित प्रस्ताव स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरीसाठी येईल.

# देवेंद्र फडणवीस यांची महाराष्ट्राला गरज, लोकं त्यांना दिल्लीला पाठवण्याची का घाई करत आहेत?

प्रतिनिधी ४ ऑगस्ट

## प्रवीण दरेकर यांचा सवाल



मुंबई: देवेंद्र फडणवीस यांची महाराष्ट्राला गरज आहे. पक्ष नेतृत्व त्यांना महाराष्ट्रातच ठेवेल, असा विश्वास आहे, असं भाजप नेते प्रवीण दरेकर म्हणाले आहेत. खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याला भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी प्रत्युत्तर दिले आहे. प्रवीण दरेकर यांनी संजय राऊत यांनी वर्तवलेलं भाकीत चुकीचं असल्याचं स्पष्ट केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची महाराष्ट्राला गरज असून ते महाराष्ट्रातच राहणार असल्याचं प्रवीण दरेकर यांनी स्पष्ट केलं आहे. "हा पक्षांतर्गत विषय आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि पक्ष नेतृत्व नितीन नबीन हे ठरवत असतात. मला वाटतं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रातच राहणार आहेत. महाराष्ट्राला त्यांची गरज आहे", असं प्रवीण दरेकर म्हणाले."महाराष्ट्र ज्या पद्धतीने आज विकसित होतोय, महाराष्ट्र आज खऱ्या अर्थाने विकासाकडे जाताना दिसत आहे. याचगतीने पुढच्या पाच ते दहा वर्षात महाराष्ट्राचा विकास व्हायला हवा असेल तर देवेंद्र फडणवीस यांच्यासारखे अभ्यासू आणि व्हिजनरी नेतृत्व हवं आहे", असा दावा प्रवीण दरेकर यांनी केलं.

**'कुणाचं षडयंत्र आहे का? अशी शंका वाटते'**

"एवढं मोठं राज्य जे विकसित होतंय, अशावेळेला पंतप्रधान नरेंद्र मोदी देवेंद्र फडणवीस यांना महाराष्ट्रातच ठेवतील. लोकं त्यांना दिल्लीला पाठवण्याची का घाई करत आहेत? कुणाचं काही षढयंत्र आहे का, अशी शंका वाटते", असा दावा दरेकर यांनी केला.

"महाराष्ट्राच्या जनतेला देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री म्हणून हवे आहेत. आमचं पक्ष नेतृत्व तशाचप्रकारे त्यांच्या मागे ताकदीने उभे राहील, असा मला विश्वास आहे", असं प्रवीण दरेकर म्हणाले. टीव्ही ९ मराठीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी संबंधित वक्तव्य केलं. "अमित शाह यांना गटाची आवश्यकता नाही. पक्षच मोदी, शाह आणि नितीन नबीन यांच्या नेतृत्वाखाली वाटचाल करत आहे. अमित शाह हे आमच्या पक्षाच्या निर्णय प्रक्रियेतील जबाबदार नेते आहेत. त्यामुळे त्यांना स्वतंत्र गटाची आवश्यकता नाही. संपूर्ण पक्षच त्यांचा गट आहे", अशी प्रतिक्रिया प्रवीण दरेकर यांनी दिली.

### दरेकर यांची शिरसाट आणि बच्चू कडूंवर टीका

"महायुती भक्कम राहावी यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नेहमी भूमिका घेतली आहे. पण दुर्दैवाने असे काही नेते आहेत जे महायुतीच्या धोरणांशी विसंगत बोलतात आणि वागतात. त्यातलाच हा भाग आहे. शिवसेनेचे मंत्री संजय शिरसाट आणि आमदार बच्चू कडू यांनी सीजेपीचे प्रमुख अभिजीत दिपके यांची भेट घेणं सध्याच्या पार्श्वभूमीवर योग्य नव्हतं", अशी खंत प्रवीण दरेकर यांनी व्यक्त केलं. "बच्चू कडू यांनी प्रसिद्धीच्या हव्यासापोटी आंदोलनकर्त्याला भेटायला गेलो हे बोलणं योग्य नव्हतं. भेटणं आणि पेढे भरवणं योग्य नव्हतं. कारण अभिजीत दिपके यांनी केंद्र सरकारच्या विरोधात मोदी आणि अमित शाह यांना टार्गेट करुन आंदोलन केलं होतं. अशावेळेला महायुतीत असताना आपण अशाप्रकारचं कृत्य करणं योग्य नाही. एकनाथ शिंदे यांनी समज दिली असेल तर त्याचं स्वागत आहे. युती अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी सामंजस्याने वागलं पाहिजे. बेजबाबदार वक्तव्य करता येणार नाही", अशी भूमिका प्रवीण दरेकर यांनी मांडली.

# शेतकऱ्यांना यूरियासोबत महागडी खते घेण्याची सक्ती? रोहित पवारांचा आरोप

प्रतिनिधी ४ ऑगस्ट

## कृषीमंत्र्यांनी केला खुलासा

**मुंबई:** शेतकऱ्यांना यूरियासोबत महागडी खते घेण्याची सक्ती केली जात असल्याचा आरोप रोहित पवारांना केला होता. त्यावर आता कृषीमंत्र्यांना खुलासा केला आहे.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावरून कृषी सेवा केंद्र चालक यूरियासोबत दुय्यम अथवा महागड्या खतांची सक्तीने विक्री करत असल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक भार पडत असल्याचा मुद्दा उपस्थित करत संबंधितांवर कारवाईची मागणी केली होती.

त्यानंतर राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी याबाबत सरकारची भूमिका मांडली आहे. या संदर्भात महाराष्ट्र शासनाने यापूर्वीच अशा प्रकारच्या लिंकिंगला बंदी घालून कायदेशीर कारवाईचे स्पष्ट निर्देश जारी केले असल्याचं कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितलं. "शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार केवळ आवश्यक असलेली कृषी निविष्ठा खरेदी करण्याचा पूर्ण अधिकार आहे.

अनुदानित खतांसोबत इतर उत्पादने सक्तीने विकणं हा अन्यायकारक प्रकार असून, अशा लिंकिंगला राज्य शासनाने आधीच बंदी घातली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल," असं कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केलं आहे. दत्तात्रय भरणे पुढे बोलताना म्हणाले की, "राज्यात अनुदानित खतांच्या विक्रीसोबत विना अनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते, जैवउत्तेजके व इतर कृषी निविष्ठांची सक्तीने विक्री (टॅगिंग/लिंकिंग) होत असल्याच्या तक्रारी लक्षात घेऊन राज्य शासनाने २० मे २०२६ रोजीच शासन परिपत्रक काढून अशा प्रकाराला तात्काळ बंदी घातली आहे. तसंच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उत्पादक, पुरवठादार कंपन्या आणि संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले असून, या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत," असं भरणे यांनी सांगितलं.

दरम्यान, शेतकऱ्यांनी खतांच्या खरेदी व विक्रीदरम्यान कोणत्याही प्रकारचे टॅगिंग किंवा लिंकिंग होत असल्यास टोल फ्री क्रमांक १८००-२३३-४००० किंवा व्हॉट्सॲप क्रमांक ९८२२४४६६५५ वर तात्काळ तक्रार नोंदवावी, असं आवाहनही कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केलं आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ♦ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ♦ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135